# * क्रीडा व सांस्कृतिक विभाग *

| अ. क्र. | सेवा | सेवा पुरवणारे अधिकारी | संपर्क कालावधी | सेवा पुरविण्याची विहित मुदत | सेवा मुदतीत न पुरविल्यास तक्रार करावयाचे वरिष्ठ अधिकारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | क्रीडा संकुलातील मैदान उपलब्ध करून देणे | क्रीडा अधिकारी | सकाळी १०.०० ते सायं ५.४५ वा. | कागदपत्रांची पूर्तता झाल्यानंतर आरक्षण तारखेच्या १५ दिवसपूर्व | उप आयुक्त (क्रीडा व सांस्कृ) |
| २ | क्रीडा प्रशिक्षण केंद्रात क्रिकेट व कबड्डी प्रशिक्षणासाठी प्रवेश | क्रीडा अधिकारी | सकाळी १०.०० ते सायं ५.४५ वा. | कागदपत्रांची पूर्तता झाल्यानंतर ७ दिवस | उप आयुक्त (क्रीडा व सांस्कृ) |
| ३ | व्यायामशाळा सुविधा | क्रीडा अधिकारी | सकाळी १०.०० ते सायं ५.४५ वा. | कागदपत्रांची पूर्तता झाल्यानंतर ७ दिवस | उप आयुक्त (क्रीडा व सांस्कृ) |
| अ. क्र. | सेवा | सेवा पुरवणारे अधिकारी | संपर्क कालावधी | सेवा पुरविण्याची विहित मुदत | सेवा मुदतीत न पुरविल्यास तक्रार करावयाचे वरिष्ठ अधिकारी |
| ४ | क्रीडा शिष्यवृत्ती मिळणे | क्रीडा अधिकारी | सकाळी १०.०० ते सायं ५.४५ वा. | आर्थिक वर्षामधील एक वेळ विभागाकडून आवाहन प्रसिद्ध करून कागदपत्रांची पूर्तता झाल्यानंतर | उप आयुक्त (क्रीडा व सांस्कृ) |
| ५ | यशवंतराव चव्हाण फुटबॉल मैदान | क्रीडा अधिकारी | सकाळी १०.०० ते सायं ५.४५ वा. | कागदपत्रांची पूर्तता झाल्यानंतर आरक्षण तारखेच्या १५ दिवस पूर्व | उप आयुक्त (क्रीडा व सांस्कृ) |

## क्रीडा संकुलातील विविध उपक्रम प्रवेशासाठी आवश्यक कागदपत्रे

१) क्रीडा प्रशिक्षण केंद्रामध्ये दिल्या जाणाऱ्या क्रिकेट व कबड्डी या खेळाच्या ८ ते १६ वयोगटातील मुलामुलींच्या प्रशिक्षणाकरीता प्रवेश अर्जाचा विहित नमुना भरणे आवश्यक

२) या अर्जासोबत : वैद्यकियदृष्टया पात्र असल्याबाबतचा वैद्यकीय दाखल्याची छायांकित प्रत / शाळेचे बोनाफाईड प्रमाणपत्र.

३) महापालिका क्षेत्रातील जिल्हा, राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर प्राविण्यप्राप्त विद्यार्थी खेळाडूंना देण्यात येणा-या क्रीडा शिष्यवृत्ती मागणी अर्जासोबत वास्तव्याचा दाखला, गतवर्षीचे मार्कलिस्ट व खेळाचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

४) क्रीडा संकुलातील मैदान आरक्षणासाठी संबंधित शाळा/ विद्यालय, क्रीडा संघटना, क्रीडा संस्था व कंपनी यांनी आपल्या लेटरहेडवर क्रीडा संकुलात अर्ज सादर करावेत.

५) मैदान आरक्षण करावयाचे झाल्यास त्याकरीता किमान ३० दिवस अगोदर अर्ज सादर करावा लागेल.

**क्रीडा संकुलातील प्रवेशाबाबत सर्वसाधारण अटी व शर्ती**

१) प्रवेशापूर्वी प्रशिक्षणार्थी पूर्णपणे तंदरुस्ती असल्याबाबत वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

२) वैद्यकीय दृष्टया अपात्र असलेल्या मुलामुलींना प्रवेश दिला जाणार नाही.

३) प्रशिक्षणासाठी पात्र ठरलेल्या विद्यार्थ्याकडे क्रीडा प्रशिक्षण केंद्राने ठरवून दिलेल्या विहित नमुन्यातील स्वतःचे खेळनिहाय एक संपुर्ण क्रीडा गणवेश सेट (स्पोर्टस किट) असणे बंधनकारक आहे. (मनपा शाळेतील विद्यार्थ्याव्यतिरिक्त)

४) प्रशिक्षकांनी तसेच क्रीडा संकुलातील अधिकारी/कर्मचारी यांनी वेळोवेळी दिलेल्या सुचनांचे काटेकोरपणे पालन करणे खेळाडूंना बंधनकारक राहील.

५) प्रशिक्षणार्थी मैदान स्वच्छ ठेवणे, तसेच क्रीडा संकुल, सीमाभिंत, प्रवेशद्वार, विद्युत फिटींग, पाण्याची टाकी, नळ, क्रीडा संकुल इमारत व त्याचे भाग यांनी नुकसान होणार नाही यांची दक्षता घ्यावी.

६) मैदान आवारातील झाडे, हिरवळ यांचे नुकसान होणार नाही याची दक्षता घ्यावी अन्यथा वृक्ष संवर्धन कायद्यान्वये कायदेशीर कारवाई प्रस्तावित करण्यात येईल, तसेच प्रवेश रद्द करण्यात येईल.

७) सराव करत असतांना कोणत्याही खेळाडूस इजा अथवा दुखापत झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी खेळाडूवर राहील. त्यास नवी मुंबई महानगरपालिका जबाबदार असणार नाही.

**8) प्रशिक्षण वेळ व कालावधी -**

१) सायंकाळ सत्र ४.३० ते ६.३० पर्यत

२) सकाळी ६.०० चे अगोदर किंवा संध्याकाळी ७.०० नंतर कोणत्याही खेळाडूस सराव करण्यास परवानगी देण्यात येणार नाही

३) क्रिकेट मैदान मंगळवार ते रविवार दिवसांकरीताच उपलब्ध राहील. क्रीडा संकुलातील मैदान दर सोमवारी बंद ठेवण्यात येईल.

4) फुटबॉल मैदान बुधवार ते रविवार प्रतीतास याप्रमाणे शुल्क आकारुन खेळण्यासाठी उपलब्ध राहील.

*************************************************************************************